# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**(दुपार)**

---

**दिनांक ०३.०९.२०२६ गुरुवार**

**आगामी सण उत्सवानिमीत्ताने नागपुर शहर पोलीस आयुक्तांची महत्वाची अधिसुचना :–**

आगामी येणारे सण उत्सव जसे, गोकुळाष्टमी, दहीहांडी, पोळा, तान्हापोळा, ताजुद्‌दीनबाबा छब्बीसी, श्रीगणेश उत्सव आगमण व विसर्जन मिरवणुका, धम्मचक्र प्रवर्तन दिन, दुर्गाउत्सव आगमण व विसर्जन मिरवणुका यामध्ये विविध प्रकारचे साऊंडसिस्टीम व मॉडीफाईड साऊंडसिस्टीम वाहने याचा वापर करण्यावरून विविध मंडळाचे पदाधिकारी, कार्यक्रमाचे आयोजक व संघटना, पक्षाचे कार्यकर्ते व पोलीस प्रशासन यांचेमध्ये वाद–विवाद होवुन तणाव निर्माण होतो व त्यामुळे कायदा व सुव्यस्थेचा प्रश्न निर्माण होतो. तसेच, पर्यावरण संरक्षण कायदा–१९८६ व ध्वनी प्रदुषण नियम–२००० मधील ध्वनीमर्यादेचे उल्लंघन होते. त्याचप्रमाणे सण–उत्सवादरम्यान बिम लाईट/लेझर लाईटचे वापरामुळे सामान्य नागरीकांच्या डोळ्यांना ईजा होवुन आरोग्यास धोका निर्माण होण्याची तसेच, वाहन चालकाद्वारे वाहनावरील नियंत्रण सुटुन अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

याकरीता, आगामी येणारे सण–उत्सव संबंधाने सर्व कार्यक्रमाचे आयोजक, पदाधिकारी तसेच, साऊंडसिस्टीम संचालक, साऊंडसिस्टीम वाहनधारक व बिम/लेझर लाईट सिस्टीम संचालक यांना याद्वारे कळविण्यात येते की, दिनांक ०४.०९.२०२६ ते दिनांक ०१.११.२०२६ दरम्यान, सर्व प्रकारचे डॉल्बी साऊंड, प्लाझमा साऊंड, प्रेशर मिडसिस्टीम व मॉडीफाईड साऊंडसिस्टीम वाहने तसेच, बिमलाईट, लेझर बिमलाईट यांचे वापरावर बंदी घालण्यात आलेली आहे. यांचा वापर किंवा उपयोग करू नये. भारतीय नागरीक सुरक्षा संहीता–२०२३ मधील कलम १६३ अन्वये यांचे वापरावर प्रतीबंध करण्यात येत आहे. वरील प्रतीबंध आदेश दिनांक ०३.०९.२०२६ चे रात्री २४.०० वा. ते दिनांक ०१.११.२०२६ चे रात्री २३.५९ वा. पर्यंत अंमलात राहील, याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :–**

दिनांक ०२.०९.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ कायद्यान्वये ०७ केसेसमध्ये ११ ईसमावर कारवाई करून एकुण २०,३४,५३०/–रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जुगार कायदा अन्वये ०२ केसेसमध्ये १७ इसमांवर कारवाई करून एकुण १,७६,२२०/–रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली ३,०१५ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. ९,६४,५५०/–रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा सामाजीक सुरक्षा विभाग पोलीसांची कामगिरी :— देहव्यवसाय करवुन घेणाऱ्या हॉटेलमालक आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ०२.०९.२०२६ चे १८.२० वा. ते २२.५० वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा सामाजीक सुरक्षा विभाग पथकाचे अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असतांना, त्यांना मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, त्यांनी पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीत, 'हॉटेल युनिव्हर्स' चे रुम क्र. १०४, विहीरगाव, उमरेड रोड, नागपूर येथे पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, तेथे हॉटेलमालक आरोपी संतोष बचईराम शर्मा वय ५१ वर्षे, रा. पार्वतीनगर, प्लॉट क्र. ११७, अजनी, नागपुर हा स्वतःचे आर्थिक फायद्याकरीता ग्राहकांना देहव्यापाराकरीता जागा उपलब्ध करून देवुन, पिडीत महीलेस कमी वेळात जास्त पैसे कमविण्याचे आमिष देवुन, तीचेकडुन देहव्यवसाय करवुन घेताना समक्ष मिळुन आला. आरोपीचे ताब्यातुन ०१ पिडीत महीलेची सुटका करण्यात आली. आरोपीचे ताब्यातुन रोख ३,०००/—रू., ०१ मोबाईल फोन, ०१ डीव्हीआर व इतर साहित्य असा एकुण किंमती ५६,८४०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीविरूध्द पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे कलम १४३(२) भा.न्या.सं., सहकलम ३,४,५,७ अनैतिक देहव्यापार प्रतिबंधक अधिनीयम अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. आरोपीस अटक करून, मुद्देमालासह पुढील कारवाईस्तव हुडकेश्वर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले.

वरील कामगिरी नागपूर शहर चे मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. राजेंद्र दाभाडे, मा. पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन) श्री. दीपक अग्रवाल, मा. सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) श्री. वैभव जाधव यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. दर्शन पाटील, सपोनि. शिवाजी ननवरे, पोहवा. किशोर ठाकरे, मपोहवा आरीत चव्हाण, पोअं. कुणाल बोडखे, नितीन वासने व मपोअं. पुनम शेंडे यांनी केली.

**३) गुन्हेशाखा सोनसाखळी चोरी विरोधी पथकाची कामगिरी :— शस्त्रासह धुमाकुळ घालणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक ०२.०९.२०२६ चे १२.५५ वा. चे सुमारास, गुन्हेशाखा सोनसाखळी चोरी विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे सदर हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, सदर पोस्ट ऑफीस, मदन वाईन शॉपसमोर, शुभम नावाचा इसम ज्याने अंगात काळया रंगाचा टिशर्ट घातलेला असुन तो येणाऱ्या जाणाऱ्या लोकांना शिवीगाळ करुन शस्त्रासह धुमाकुळ घालत आहे. अशा खात्रीशीर माहितीवरुन नमुद ठिकाणी गेले असता, तेथे मिळालेल्या वर्णनाचा इसम हातात तलवार घेऊन धुमाकुळ घालतांना दिसुन आला. त्यास ताब्यात घेऊन निशस्त्र केले व पंचासमक्ष त्याचे नांव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नांव शुभम नरेश जांभुळकर वय २६ वर्षे, रा. गड्डीगोदाम, सुंदरबाग, लाड यांचे घराजवळ, सदर, नागपुर असे सांगीतले. आरोपीचे ताब्यातुन एक लोखंडी छोटी तलवार किंमती अंदाजे ५००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने तलवार बाळगुन धुमाकुळ घालतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे सदर येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. आरोपीस मुद्देमालासह पुढील कारवाईकामी सदर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी नागपूर शहर चे मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. राजेंद्र दाभाडे, मा. पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन) श्री. दीपक अग्रवाल, मा. सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) श्री. वैभव जाधव यांचे मार्गदर्शनाखाली, सपोनि. मंगला हरडे, पोहवा. प्रफुल्ल मानकर, मनिष बुरडे, पोअं. कुणाल लांडगे, अनिकेत इंगळे व संदीप पडोळे यांनी केली.

**(गुन्हे)**

**पोलीस ठाणे सिताबर्डी :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ०२.०९.२०२६ चे १६.५० वा. चे सुमारास, फिर्यादी व त्यांचे पती नामे रामदास गणबाजी पाटील वय ७४ वर्षे रा. ४१०, कुकडे ले आऊट, रामेश्वरी रिंग रोड, चंद्रमणी गार्डनजवळ, अजनी, नागपुर हया वोक्हॉर्ट हॉस्पिटल येथे रुटीन चेकअप करुन, त्यांचे प्लेझर गाडी क्र. एमएच ३३ जे ६७८५ ने पोलीस ठाणे सिताबर्डी हद्दीत, पुनम सेंट्रल मॉलचे विरुध्द बाजुस, काचीपुरा चौकाकडे जाणारे रोडने घरी परत जात असतांना, त्यांची मोपेड अचानक स्लीप झाल्याने, गाडीवरील फिर्यादी व त्यांचे पती खाली पडले, त्याचवेळी मागुन येणारी काळया रंगाचे चारचाकी वाहन चालक आरोपीने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन रोडवर पडलेल्या पतीचे डोक्यावरुन वाहन नेल्याने घटनास्थळीच त्यांचे मरणास कारणीभुत होऊन तेथून वाहनासह पळुन गेला.

यांप्रकरणी फिर्यादी श्रीमती करुणा रामदास पाटील वय ६५ वर्षे रा. ४१०, कुकडे ले आऊट, रामेश्वरी रिंग रोड, चंद्रमणी गार्डनजवळ, अजनी, नागपुर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे सिताबर्डी येथे पोउपनि अनिकेत सोनावणे ८३०८५२९५९७ यांनी कारचालक आरोपीविरूध्द कलम १०६(१),१२५(अ),२८१ भा.न्या.सं., सहकलम १३४,१७७,१८४,१८७ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**१) पोलीस ठाणे गिट्टीखदान :—** दिलीप सुखचैन करचाम वय ३५ वर्षे रा. वार्ड क्र. २, घोट रोड, चारटोला पोठा. आरई, मध्यप्रदेश हे दिनांक ३०.०८.२०२६ चे ०७.०० वा. पासुन पोलीस ठाणे गिट्टीखदान हद्दीतून कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **वर्णन** रंग—सावळा, चेहरा—लांबट, बांधा—सडपातळ, उंची—५ फुट, डोळे—काळे, केस—काळे, अंगात— पिवळी हॉफ टिशर्ट व फिक्कट हिरवा हॉफ पॅन्ट घातलेला आहे. भाषा— हिंदी बोलतात. ओळख— मनोरुग्ण आहे.

**२) पोलीस ठाणे हुडकेश्वर:—** सतिष वासुदेव डाहाके वय ३२ वर्षे रा. गाव सालई, गोधनी, पाचगाव नागपूर हे दिनांक ०१.०९.२०२६ चे ११.३० वा. पासुन दुबे नगर येथील त्यांचे मोठे आईचे घरुन ब्रम्हपुरी येथे कामाला जातो असे म्हणून निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **वर्णन** रंग—सावळा, चेहरा—गोल, बांधा—सडपातळ, उंची—५ फुट ७ इंच, केस—काळे, अंगात— कत्था रंगाचा शर्ट व क्रिम रंगाचा पॅन्ट घातलेला आहे. भाषा— मराठी/हिंदी बोलतात.

**३) पोलीस ठाणे गिट्टीखदान :—** नारायण मुराजी शाहु वय ५२ वर्षे रा. चाकुरसेनी, पोलीस ठाणे नारायणगढ, जि. मिदनापुर, पश्चिम बंगाल हे दिनांक २५.०८.२०२६ चे १०.३० वा. पासुन पोलीस ठाणे गिट्टीखदान हद्दीतून कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **वर्णन** रंग—सावळा, चेहरा—लांबट, बांधा—मजबुत, उंची—५ फुट ६ इंच, डोळे—काळे, केस—काळे पांढरे व समोरुन टक्कल पडलेले, अंगात— खाकी रंगाचा शर्ट व काळा हॉफ पॅन्ट घातलेला आहे. भाषा—बंगाली/हिंदी बोलतात. ओळख— नाकावर जुने जखमेचे आहे.

**४) पोलीस ठाणे हुडकेश्वर:—** निलेश राजु धांडे वय ३७ वर्षे रा. प्लॉट क्र. ११, स्वागत नगर, श्रीकृष्ण मंदीर जवळ, न्यु नरसाळा, हुडकेश्वर नागपूर हे दिनांक २७.०८.२०२६ चे १९.४५ वा. पासुन आपले राहते घरी दारु पिण्याचे कारणावरुन भांडण झाल्याने रागाचे भरात कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **वर्णन** रंग—गोरा, चेहरा—गोल, बांधा—मध्यम, उंची—५ फुट ७ इंच, केस—काळे, अंगात— काळया रंगाचा फुलशर्ट व निळया रंगाचा जिन्सपॅन्ट घातलेला आहे. भाषा— मराठी/हिंदी बोलतात.

**<u>५) पोलीस ठाणे गिट्टीखदान</u> :—** शुभम चिंतामणी शेहोकर, वय १९ वर्षे, रा. वायुसेना क्वॉर्टर क्र. ६, गिट्टीखदान, नागपूर हा दिनांक २९.०८.२०२६ चे ११.०० वा. पासुन पोलीस ठाणे गिट्टीखदान हद्दीतून कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेला. घरी परत आला नाही. त्याचा शोध घेतला असता मिळून आला नाही. **<u>वर्णन</u>** रंग—निमगोरा, चेहरा—गोल, बांधा—सडपातळ, उंची—५ फुट ६ इंच, डोळे—काळे, केस—काळे अंगात—पिवळया रंगाचा टिशर्ट व निळा लोअरपॅन्ट घातलेला आहे. भाषा—मराठी/हिंदी बोलतात. ओळख— डावे डोळयाजवळ कट मारल्याचे निशान.


दिलीप


सतिष


नारायण


निलेश


शुभम

**स्वा/—**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**